# अशोक पत्की यांची संगीत कार्यशाळा

## रोटरी क्लब ऑफ पुणे आणि 'लोकमत' यांचा संयुक्त उपक्रम

पुणे | दि. २ (प्रतिनिधी)



रोटरी क्लब ऑफ पुणे गांधीभवन आणि 'लोकमत' यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की यांच्या सुगम संगीताच्या 'सप्तसूर संगीत कार्यशाळे'चे आयोजन करण्यात आले आहे. १२ ते १५ एप्रिल २०१२ या कालावधीत रोज ३ तास ही कार्यशाळा होईल. कार्यशाळेत प्रवेश देण्यापूर्वी उमेदवाराची ऑडिशन घेऊन प्रवेश निश्चित केला जाईल. ऑडिशन दि. १० व ११ मार्च रोजी होणार आहे.

या कार्यशाळेमध्ये (सिनेसंगीत, भावगीते, भक्तिगीते) भावार्थ, उच्चार, लय, ताल, सूर, रियाज करण्याची पद्धत माइक टेक्निक इत्यादी गोष्टी शिकविण्यावर भर देण्यात येणार आहे. तसेच, कार्यशाळेअंतर्गत शेवटच्या दिवशी एक स्टेज परफॉर्मन्स आयोजित करण्यात येईल. ज्या विद्यार्थ्यांना सुगम संगीतात कारकीर्द करायचीय किंवा पार्श्वगायनाची आवड आहे अशासाठी ही सुवर्णसंधी ठरेल. पुढील केंद्रांवर ऑडिशनचे फॉर्म उद्यापासून (दि. ३) उपलब्ध आहेत : (१) नावडीकर म्युझिकल्स, टिळक रस्ता आणि कोथरूड, (२) वैशाली ब्यूटी सेंटर, गुडलक चौक आणि डेक्कन, (३) एस. के. फिटनेस सेंटर, नारायण पेठ. अधिक माहितीसाठी आणि कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी २५४६१७२५ व ९८२२०७८७३१ या क्रमांकांवर सकाळी ११ ते दुपारी १ आणि ४ ते सायंकाळी ७ या वेळेत संपर्क साधावा.

'लोकमत'च्या सखी मंच, युवा नेक्स्ट आणि बालविकास मंचच्या सदस्यांना विशेष सवलतीच्या दरात या कार्यशाळेत प्रवेश घेता येईल.